जा.क्र.जिउनिव/नियमन/कलम ७७-अ/बेरोजगार संस्था संघ/ /२७

कार्यालय – जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वर्धा,

केळकर वाडी, आर्वी रोड, वर्धा.

दिनांक - १६ /०६/२०१७

वाचा :

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७-अ मधील वैधानिक तरतूद
२. या कार्यालयाचे पत्र क्र.जिउनि/नियमन/मतदार यादी सादर करणेबाबत/३३९९/सन २०१५, दि.३०/११/२०१५
३. या कार्यालयाचे पत्र क्र.जिउनि/नियमन/मतदार यादी सादर करणेबाबत/१२२१/१६, दि.१८/३/२०१६
४. अध्यक्ष, वर्धा जिल्हा सेवा सहकारी संस्था फेडरेशन मर्या.वर्धा र.नं.२९८ यांनी दि.१०/३/२०१७ अन्वये सादर केलेला खुलासा.

---

ज्याअर्थी, **वर्धा जिल्हा बेरोजगार सेवा सहकारी संस्थांचा संघ मर्या.वर्धा र.नं.२९८** (यापुढे संघ म्हणून संबोधित) हा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (यापुढे कायदा म्हणून संबोधित) व त्या अंतर्गतचे नियम १९६१ अंतर्गत नोंदणीकृत झाला असून संघाला सहकारी कायदा, नियम, संस्थेची मंजूर उपविधी तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकीय सुचना आणि निबंधकाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे पालन करणे बंधनकारक आहे. आणि

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३-कब अन्वये सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण गठित करण्यात आले आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम, २०१४ मधील तरतूदीनुसार राज्यातील सर्व सहकारी संस्थांना निवडणूक प्रक्रिया पार पाडणे बंधनकारक आहे. संघ दिनांक १६/१/२०१५ रोजी निवडणूकीस पात्र झाला आहे. तथापि, दिनांक १६/१/२०१५ या अर्हता दिनांकानुसार मतदार यादी ई-३(१) नमुन्यामध्ये, नमुना ई-२ सह सादर करण्याबाबत उक्त संदर्भीय पत्रानुसार संघाला निर्देश देण्यात आले होते. आणि

ज्याअर्थी, सुचना देऊनही संघाने मतदार यादी व इतर अनुषंगिक कागदपत्रे या कार्यालयास सादर केलेले नसल्यामुळे संघाचे सभासद, संघाचे कामकाज चालविण्यास उत्सुक नाही असे निदर्शनास आल्यावरुन संघाच्या विद्यमान समितीने कायद्यातील कलम ७३ मध्ये विर्निर्दिष्ट केल्याप्रमाणे मुदत संपण्यापुर्वी समितीची रचना करण्यासाठी निवडणूक घेण्याकरीता आवश्यक व्यवस्था करण्यात कसुर केल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे उक्त वाचा क्र.१ चे तरतूदीनुसार नविन समिती पदग्रहण करेपर्यन्त संघाचे कामकाज पाहण्यासाठी संघावर प्राधिकृत अधिकाऱ्याची नेमणूक कां करण्यात येऊ नये? याबाबत हरकती व सुचना आणि संस्थेचा खुलासा सदर नोटीसच्या दिनांकापासून १५ दिवसांचे आंत या कार्यालयास सादर करणेबाबत वरील संदर्भीय क्र.३ चे नोटीस नुसार कळविण्यात आले होते. आणि

ज्याअर्थी, संस्थेचे अध्यक्ष यांनी संदर्भीय क्र.४ चे पत्रान्वये त्यांचा खुलासा विहीत मुदत संपल्यानंतर विलंबाने सादर केलेला आहे. सदर खुलाशात त्यांनी नमुद केले की, संस्था दिनांक १६/०१/२०१५ रोजी निवडणूकीस पात्र झाली आहे. संस्थेचे अध्यक्ष व सचिव हे महत्त्वाचे कामासाठी बाहेरगांवी गेल्यामुळे संस्थेचे इतर पदाधिकाऱ्यांना प्राप्त झालेल्या पत्रावर कार्यवाही करता आली नाही. परंतु सद्यस्थितीत संस्थेचे अध्यक्ष व सचिव हे कामकाज सुव्यवस्थित पहात असून संबंधित संस्थेचे पदाधिकाऱ्यांनी मतदार यादी ई-३(१) नमुन्यामध्ये व ई-२ नमुन्यामध्ये माहिती ची पुर्तता करुन सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे असे नमुद केलेले आहे. आणि

ज्याअर्थी, संस्थेच्या संचालक मंडळाचा ५ वर्षांचा कालावधी संपुष्टात येण्यापुर्वी संस्थेची निवडणूक घेण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करणे ही संस्थेची कायद्यानुसार वैधानिक जबाबदारी असल्यामुळे व संस्थेच्या खुलाशावरुन त्यांनी विहीत कालावधीत संघाची निवडणूक घेण्यासंबंधाने उचित कार्यवाही केलेली नसल्यामुळे संघाने नमुद केलेला खुलासा मान्य करता येत नाही. आणि संघाची मुदत संपण्यापुर्वी समितीची रचना करण्यासाठी निवडणूक घेण्याकरीता आवश्यक व्यवस्था करण्यास कसुर केलेला आहे हे स्पष्ट झाले आहे. त्याअर्थी, उक्त वाचा क्र.१ चे कलम ७७-अ मधील तरतूदीनुसार नविन समिती पदग्रहण करेपर्यन्त संघाचे कामकाज पाहण्यासाठी संघावर प्राधिकृत अधिकाऱ्याची नेमणूक करणे आवश्यक झालेले आहे अशी या कार्यालयाची खात्री झालेली असल्याने खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

# आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७(अ) मधील तरतूदीनुसार तसेच महाराष्ट्र शासन सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे आदेश क्र.सीएसएल-१४९३/११६२/ सी.आर.४७/१५-सी, दिनांक ७/८/१९९३ नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये मी, ए.बी.कडू, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वर्धा याद्वारे **वर्धा जिल्हा बेरोजगार सेवा सहकारी संस्थांचा संघ मर्या.वर्धा र.नं.२९८** या संघावर प्राधिकृत अधिकारी म्हणून श्री.के.एच.जाधव, सहकार अधिकारी श्रेणी-१ अंतर्गत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.वर्धा यांची नियुक्ती करण्यात येत आहे. प्राधिकृत अधिकारी यांनी तात्काळ संघाचा प्रभार घेऊन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०, त्या अंतर्गतचे नियम १९६१, संस्थेची मंजूर उपविधी व या कार्यालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेश/सुचनांनुसार कामकाज करावे व पुढील सहा महिन्यात संस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक घेऊन नविन समितीची रचना करावी.

सदर आदेश आज दिनांक १६/०६/२०१७ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी पारीत करण्यात येत आहे.

( ए.बी.कडू )
**जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, वर्धा**

प्रति,

१. श्री.के.एच.जाधव, प्राधिकृत अधिकारी तथा सहकार अधिकारी श्रेणी-१ अंतर्गत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.वर्धा
२. अध्यक्ष/सचिव, वर्धा जिल्हा बेरोजगार सेवा सहकारी संस्थांचा संघ मर्या.वर्धा र.नं.२९८

प्रत माहितीस्तव सविनय सादर :

१. मा.सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर

प्रत प्रसिद्धीकरीता रवाना :

१. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.वर्धा
२. संघाच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्धीकरीता
३. या कार्यालयाचे नोटीस बोर्डवर प्रसिद्धीकरीता

**महाराष्ट्र शासन**

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वर्धा यांचे कार्यालय**

**केळकर वाडी, आर्वी रोड, वर्धा**

३८९e

दुरध्वनी क्रमांक: ०७१५-२२५५७५६ ईमेल: ddr_wda@rediffmail.com

जा.क्र.जिउनि/नियमन/महा.स्टेट हाऊ.फायनान्स/प्रा.मत.यादी/ /१८

दिनांक :- ८/४/२०१८

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७-अ (४) अंतर्गत आदेश

**वाचा : १) या कार्यालयाचे आदेश क्र.जिउनिव/नियमन/कलम ७७-अ/बेरोजगार संस्था संघ/२०१९/१७, दिनांक १७/६/२०१७**

**२) श्री.के.एच.जाधव, प्राधिकृत अधिकारी, वर्धा जिल्हा बेरोजगार सेवा सहकारी संस्थांचा संघ मर्या.वर्धा र.नं.२९८ यांचे पत्र दिनांक ६/२/२०१८**

**३) श्री.के.एच.जाधव, प्राधिकृत अधिकारी, वर्धा जिल्हा बेरोजगार सेवा सहकारी संस्थांचा संघ मर्या.वर्धा र.नं.२९८ यांचे पत्र दिनांक १३/४/२०१८**

ज्याअर्थी, वर्धा जिल्हा बेरोजगार सेवा सहकारी संस्थांचा संघ मर्या.वर्धा र.नं.२९८ या संघाने मुदत संपण्यापुर्वी समितीची रचना करण्यासाठी निवडणूक घेणेकरीता आवश्यक व्यवस्था करण्यास कसुर केल्यामुळे उक्त वाचा क्र.१ नुसार संघावर श्री.के.एच.जाधव, सहकार अधिकारी श्रेणी-१ अंतर्गत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.वर्धा यांची "प्राधिकृत अधिकारी" म्हणून नियुक्ती करण्यात आली. आणि

ज्याअर्थी, उपरोक्त संदर्भीय क्र.२ चे पत्रान्वये श्री.के.एच.जाधव, प्राधिकृत अधिकारी यांनी या कार्यालयास कळविल्यानुसार ते नियत वयोमानानुसार दि.३०/४/२०१८ रोजी सेवानिवृत्त झाल्यामुळे उक्त संघावर अन्य अधिकारी/कर्मचाऱ्याची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करणे आवश्यक झाले आहे. तसेच संदर्भीय क्र.३ चे पत्रान्वये त्यांनी प्रशासकीय अहवाल सादर केला आहे. त्याअर्थी खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७-अ (४) मधील तरतूद तसेच महाराष्ट्र शासन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे आदेश क्र.सीएसएल/१४९३/११६२/सीआर-४७/१५-सी, दिनांक ७ ऑगस्ट, १९९३ नुसार मला प्राप्त अधिकारानुसार मी, जे.एम.तलमले, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वर्धा याद्वारे वर्धा जिल्हा बेरोजगार सेवा सहकारी संस्थांचा संघ मर्या.वर्धा र.नं.२९८ या संघावर श्री.के.एच.जाधव, सहकार अधिकारी श्रेणी-१ यांचे ऐवजी श्री.आर.एल.वाघे, सहाय्यक निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था अधिन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वर्धा यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे. प्राधिकृत अधिकारी यांनी तात्काळ संघाचा प्रभार घेऊन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०, त्या अंतर्गतचे नियम १९६१, संस्थेची मंजूर उपविधी व वरिष्ठ कार्यालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेश/सुचनांनुसार कामकाज करावे व पुढील सहा महिन्यात संस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक घेऊन नविन समितीची रचना करावी.

सदर आदेश आज दिनांक ८/४/२०१८ रोजी माझे सही व शिक्यानिशी पारीत करीत आहे.

(जे.एम.तलमले)
**जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, वर्धा**

प्रति,

१. श्री.आर.एल.वाघे, सहाय्यक निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था तथा प्राधिकृत अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, त्वरीत संघाचा प्रभार स्विकारुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.
२. श्री.के.एच.जाधव, सेवानिवृत्त सहकार अधिकारी श्रेणी-१ यांना सुचित करण्यात येते की, उपरोक्त संघाचा प्राधिकृत अधिकारी पदाचा पदभार त्वरीत श्री.आर.एल.वाघे, सहाय्यक निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था यांचे सुपुर्द करावा व तसा अहवाल सादर करावा.

प्रतिलिपी माहितीस्तव रवाना :

१. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.वर्धा

प्रतिलिपी माहितीस्तव सविनय सादर :

१. मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर

(जे.एम.तलमले)
**जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, वर्धा**